# bhavishyavani भविष्यवाणी

bhavishya ALLIANCE

*भविष्य अलायन्सचे वार्तापत्र* — *सप्टें-ऑक्टो २००९ चा अंक*


अंतरंग:


- गर्ल्स गेनिंग ग्राऊंड – मिडीया मॅटर्सकडून प्रेरकांचे दुसऱ्या टप्प्यांचे प्रशिक्षण पूर्ण
- हातधुणे प्रकल्पातील वर्तणूक बदल संवाद मोहिम – विस्ताराची प्रक्रिया
- भविष्य अलायन्सच्या नवीन कर्मचा–यांची ओळख


## आजपर्यंत

### गर्ल्स गेनिंग ग्राऊंड - प्रकल्प अंमलबजावणीत सहभागी सर्व तालुक्यांमध्ये प्रेरकांचे दुसऱ्या टप्प्याचे प्रशिक्षण आणि नवीन संचातील गावे (सुमारे १००) आणि आश्रमशाळा (१०) मधील मुलींबरोबर सत्रांना सुरुवात:-

भविष्य अलायन्जच्या प्रतिनिधींसोबत सर्व भागीदार संस्थांनी प्रकल्प अंमलबजावणीच्या सर्व तालुक्यात आणि मुंबईमध्ये ''घेऊ भरारी'' या कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रेरकांची (सुमारे १५०) निवड पूर्ण झाली आहे. मिडीया मॅटर्सने सर्व तालुक्यातील नवीन प्रेरकांचे प्रशिक्षणही (प्रत्येक गटासाठी १० दिवसांचे एक अशी सहा वेगवेगळी प्रशिक्षण सत्रांच्या माध्यमातून) पूर्ण केले आहे. नवीन संचाच्या गावात आणि आश्रमशाळांमध्ये दाखल मुलींच्या सत्रांनाही सुरुवात झाली आहे. कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यांत ५१०० नवीन मुली (गाव / वस्त्यांमधील ३७५० मुली व आश्रमशाळांतील १३५० मुली) दाखल झाल्या आहेत.

कार्यक्रमातील पहिल्या टप्प्यामध्ये सहभागी झालेल्या मुलींसोबत बहुतेक सर्व भागीदार संस्थांनी देवाणघेवाण केली आणि माहिती वितरणाच्या कार्यशाळा घेतल्या. या कार्यशाळा अतिशय यशस्वी ठरल्या आणि सहभागी मुलींना जे शिकायला मिळाले, त्याची चर्चा प्रभावीपणे मांडण्यात आली.

*घाटकोपरमध्ये जी.जी.जी. च्या पहिल्या टप्प्यातील अनुभवांची व माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी एक कार्यशाळा*






मुंबईतील घाटकोपर भागात जी.जी.जी. कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या स्नेहा संस्थेने दिनांक १९ सप्टेंबर, २००९ रोजी सर्वोदय हॉल, घाटकोपर, येथे ''घेऊ भरारी'' कार्यक्रमात सहभागी मुलींसाठी माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी एक कार्यशाळा आयोजित केली होती. कामराज नगर, किरोळ गाव, वर्षा नगर आणि घाटकोपरमधील विक्रोळी पार्कसाईट भागातील पालक, वस्तीतील नागरिक आणि नवीन प्रेरकही या कार्यशाळेत सहभागी झाले होते. मुलींचे कार्यक्रमाबाबतचे  मत, त्यांना मिळालेली शिकवण, मुलींनी मांडली. प्रेरकांचा आणि सहभागी मुलींचा सत्कार केला गेला. नृत्य, खेळ आणि अनुभव, कथन इ. विविध कार्यक्रम या कार्यशाळेत आयोजित करण्यात आले होते.

मुली स्टेजवर आल्या आणि जी.जी.जी. कार्यक्रमातून त्या काय काय शिकल्या, या सत्रांमधून त्यांचा काय फायदा झाला आणि पुढे त्या काय करणार आहेत, याची त्यांनी मांडणी केली. ज्या पद्धतीने त्या स्टेजवर बोलत होत्या, त्यामधून त्यांचा आत्मविश्वास आणि मुलींचे हक्क, प्रजनन आरोग्य, संतुलित आणि पोषक आहार इ. विविध विषयांची त्यांनी मिळविलेली माहितीही दिसून येत होती.

अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सहभागी मुलींना सर्टिफिकेटस् देण्यात आली आणि कार्यक्रमात महत्त्वाचा सहभाग घेतल्याबद्दल प्रेरकांचाही छोटया भेटी देऊन सत्कार करण्यात आला. एकंदरीत कार्यक्रम खूप छान झाला. आपल्या वस्तीतील इतर लोकांसमोर आपले मत मांडण्याची व आपला अनुभव सांगण्याची मुलींना यांतून चांगली संधी मिळाली.

### अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील लकटू गावातील मुलींची सक्षमीकरणाकडे वाटचाल सुरु :-

अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील लकटू गावातील मुलींनी या सत्रादरम्यान दिलेल्या भेटींपैकी एका भेटीत पिण्याच्या पाण्याच्या नळाभोवती त्यांना पाण्याचे साचलेले डबके, कचरा, धुणी-भांडी करणारे लोक आणि मुलांची विष्ठा आढळली. डास व माशा तर पुष्कळ प्रमाणात होत्या. त्यांनी या गोष्टींची नोंद घेतली आणि पाण्याचे शुद्धीकरण त्यांच्या वस्ती संपर्क कृती कार्यक्रमाचा भाग करण्याचे ठरविले. (वस्ती संपर्क कृती कार्यक्रम हा जी.जी.जी. अभ्यासक्रमाचाच एक भाग आहे).

त्याच सुमारास गावातील स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांसाठीदेखील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी आरोग्य जाणीव जागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रेरक आणि मुली या जाणीव जागृती कार्यक्रमास हजर राहिल्या आणि पाणी शुद्धीकरणासाठी खर्चायला सरपंचाला रु. १०,०००/- मिळतात, अशी त्यांना माहिती मिळाली. याचा पाठपुरावा केल्यावर मुलींना समजले की, हे पैसेही खर्च झालेले नाहीत व याबाबत काहीही काम झालेले नाही. या मुली ताबडतोब सरपंचाला भेटल्या. या समस्येबाबत त्यांनी विचारणा केली आणि सरपंचांना सांगितले की, जबाबदार नागरिक म्हणून आपल्या गाव / वस्तीसाठी काहीतरी चांगले करण्याचा त्यांना पूर्ण हक्क आहे. हे ऐकताच, सरपंचांनी निमूटपणे नळ पुन्हा बसविला आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर साफ करुन घेतला.

या घटनेमुळे दुसऱ्या गावातील स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांनाही प्रेरणा मिळाली आणि त्यांनीही त्यांच्या पिण्याच्या पाण्याचे नळ दुरुस्त करुन घेतले. कविता चव्हाण या गावात जी.जी.जी. कार्यक्रमाच्या प्रेरिका आहेत. आपण त्यांचे अभिनंदन करुया!

- जी.जी.जी. प्रकल्प समन्वयक, आश्रय सेवाभावी संस्थान, अमरावती.

## हात धुणे प्रकल्पांतील वर्तणूक बदल संवाद मोहिम – विस्ताराची प्रक्रिया



*ओगिल्व्हि ॲक्शन युनिसेफच्या मास्टर ट्रेनर्सना प्रशिक्षण देतांना*

लोकांचे स्वच्छतेच्या सवयींबाबत मिळालेले सुधारित ज्ञान, दृष्टीकोन आणि सवयींचा, रोगराई निवारणावर प्रत्यक्ष परिणाम होतो. मर्यादित अन्न उपलब्ध असताना मुलांचे आरोग्य आणि पोषणाच्या बाबत या गोष्टी फार महत्त्वाच्या ठरतात. शासकीय संरचना, पद्धती आणि कार्यक्रमावर व्यापक परिणाम साधणारे सुयोग्य मॉडेल स्वीकारता यावे, यासाठी भविष्य अलायन्सने एका पायलट कार्यक्रमाची सुरुवात केली.

वर्तणूक बदल संवादाचे मॉडेल विकसित करण्यासाठी आणि त्यात योग्य ते बदल करण्यासाठी हिंदुस्तान युनिलिव्हर आणि ओगिल्व्हि ॲक्शनची नेमणूक, आरोग्य आणि पोषणाबाबत तांत्रिक सल्ला देण्यासाठी युनिसेफ व तत्सम संस्थांचा सहभाग, शासनाच्या यंत्रणा आणि संरचनामार्फत स्वयंसेवी संस्थांनी केलेली या मॉडेलची अंमलबजावणी यामुळे हा पायलट कार्यक्रम सहभागितेचे यशस्वी मॉडेल ठरला आहे.

हात धुणे प्रकल्पाला चालना देण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेले यशस्वी लाईफबॉय स्वास्थ्य चेतना मॉडेलवर युनिसेफ आणि हिंदुस्थान युनिलिव्हरने याआधीच काम केले आहे. हे मॉडेल गाव नियोजन कार्यक्रम, स्कूल्स इन डेव्हलपमेंट, उजाला आणि दीपशिखा या शासनाच्या कार्यक्रमांत अंतर्भूत व्हावे, या दृष्टीने युनिसेफने काम केले आहे.

## विस्ताराची प्रक्रिया

मुले, महिला आणि रोजगारावर काम करणारे मजूर अशा वेगवेगळया गटांसाठी योग्य असे प्रत्येकी ३० असे एकूण ९० संच ओगिल्व्हि ॲक्शनने तयार केले आहेत.

सुरुवातीला ट्रेनर्स अलायन्स, उजाला, व्हिलेज मायक्रो प्लॅनिंग, स्कूल्स इन डेव्हलपमेंट प्रोग्रॅम आणि दीपशिखा कार्यक्रमातील युनिसेफच्या ३० मास्टर ट्रेनर्सना ओगिल्व्हि ॲक्शनने प्रशिक्षण दिले.

ते ट्रेनर्स ज्या संबंधित गटाबरोबर काम करतात. त्या गटास योग्य ते संच त्यांना दिले गेले. या मास्टर ट्रेनर्सनी त्यांना मिळालेले ज्ञान नंदुरबार जिल्हयांतील गाव / वस्त्यांना त्यांची साधने वापरुन दिले. त्यानंतर नंदुरबार जिल्हयातील नवापूर आणि तळोदा तालुक्यातील संस्थांमधील १३ समन्वयक आणि ३२ तज्ञ मार्गदर्शकांना (सूक्ष्म नियोजन कार्यक्रमात सहभागी असलेल्या) एक दिवसाचे संवादात्मक प्रशिक्षण युनिसेफने सुलभ केलेल्या २१ दिवसांच्या गाव नियोजन प्रशिक्षणादरम्यान दिले गेले. युनिसेफच्या डॉ. दीपक यांच्या नेतृत्वाखाली ओगिल्व्हि ॲक्शनच्या प्रशिक्षकांनी हे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षकांना प्रत्येक गटासाठी योग्य असे १५-२० संच असलेल्या एकत्रित संचाचे असे एकूण ६० संच दिले गेले.

या प्रशिक्षकांनी त्यांचे छोटे गट तयार केले आणि साबणाने हात धुण्याचे महत्त्व पटविणारे संदेश,



*नंदुरबारच्या गावात खेळाच्या माध्यमातून हात धुण्याचा प्रसार*

### या संचात पुढील साहित्याचा समावेश आहे:-

**मुले:-**

**गोष्टीचा तक्ता** – हात धुण्याचे महत्त्व आणि ही सवय न लावल्यास होणारे परिणाम याबाबतची गोष्ट तयार करण्यासाठी

**डेमो संच:-** (सॉफ्ट बॉल्स आणि ओले वॉटर कलर्स वापरुन तयार केलेला) जसे एका बॉलवरचे ओले रंग दुसऱ्या बॉलवर पसरतात. तसे रोगजंतू एका मुलाकडून दुसऱ्या मुलाकडे पसरतात. हे दाखविण्यासाठी.

**सापशिडीचा खेळ:-** दरवेळेला जेव्हा तुम्ही आजारी पडता तेव्हा साप तुम्हांला खातो आणि तुम्ही मूळ पदाला पोहोचता आणि चांगल्या सवयी तुम्हांला शिडीवर घेऊन जातात आणि निरोगी मूल जिंकते, हे दाखविण्यासाठी.

**पोस्टर्स आणि स्टेन्सिल्स** :- पोस्टर्स आणि भिंती रंगवून वेगवेगळे संदेश पसरविण्यासाठी.

**माता:-**

**अतिसाराबाबत तक्ते:-** चुकीच्या पद्धतीने हात धुतल्यास अतिसार पुन्हा पुन्हा होऊ शकतो. हा संदेश पोहचविण्यासाठी आणि अतिसारावर नियंत्रण कसे मिळवावे, याची माहिती देण्यासाठी.

**चांगल्या व वाईट सवयी:-**(इथे एका स्वयंसेवकाचे कापडाच्या पट्टीने डोळे बांधले जातील आणि त्याला योग्य त्या पाकिटामध्ये पत्ते ठेवण्यासाठी सांगितले जाईल. जर हे काम त्याने बरोबर केले तर तो जिंकला.) योग्य अचूक व संपूर्ण माहितीशिवाय काम करणे म्हणजे डोळे बांधून पत्ते पाकिटात ठेवण्यासारखे आहे. हे दाखवून देण्यासाठी.

रोगजंतूंची माहिती असणे, ते कसे पसरतात आणि त्याचे नियंत्रण याची माहिती असणे, आयुष्यात यशस्वी होण्यासाठी या गोष्टींचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा खेळ उपयुक्त ठरतो.

**डेमोकिट** :-(सॉफ्ट बॉल्स आणि ओले वॉटर कलर्स वापरुन बनविलेला) जसा एका बॉलवरील ओला रंग दुसऱ्या बॉलवर पसरतो. तसे रोगजंतू एकाकडून दुसऱ्यांकडे पसरतात, हे दाखवून देण्यासाठी.

**रोजगारावर काम करणारे मजूर :**

**बिझनेस गेम** :-(खोटया नोटा आणि फासे वापरुन खेळायचा खेळ)औषधोपचार महागडे असतात, हे दाखविण्यासाठी. दरवेळेला तुमच्या घरातील कोणीतरी आजारी पडले की, तुम्ही घरातील कष्टाने मिळविलेला पैसा तुम्हांला औषधोपचारासाठी खर्च करायला लागतो.

डेमोकिट :-(सॉफ्ट बॉल्स आणि ओले वॉटर कलर्स वापरुन बनविलेला) जसा एका बॉलवरील ओला रंग दुसऱ्या बॉलवर पसरतो. तसे रोगजंतू एकाकडून दुसऱ्यांकडे पसरतात. हे दाखवून देण्यासाठी

नवापूर, तळोदा आणि धडगावामधील ५ दिवसीय सूक्ष्म नियोजन कार्यक्रमात मुले, स्त्रिया आणि रोजगारावर काम करणारे मजूर अशा वेगवेगळया गटांना दिले. या सूक्ष्म नियोजन प्रक्रियेत, वेगवेगळया संचाचे प्रत्यक्ष परीक्षण, वेगवेगळे कृतीकार्यक्रम वापरुन, वेगवेगळया गटांसमोर केले गेले.

नंदुरबार जिल्हयात २९५ गावांत सूक्ष्म नियोजन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापैकी २१४ गावांत (नवापूरमधील ८०गावे, तळोद्यामधील ५०गावे आणि धडगावामधील ८४गावे) हात धुणे प्रकल्पातील वर्तणूक बदल संवाद कार्यक्रम मोहिमेची पायलट मोहिम राबविण्यात आली आहे. यामध्ये ३०,००० लोकांनी सहभाग घेतला आहे.

## भविष्य अलायन्सच्या नवीन कर्मचा-यांची ओळख



*डॉ. (श्रीमती) शुभलक्ष्मी एस. अय्यर*

प्रिय मित्र,

ऑक्टोबर'२००९ मध्ये भविष्य अलायन्समध्ये प्रोग्रॅम मॅनेजर म्हणून रुजू झालेल्या डॉ.(श्रीमती)शुभलक्ष्मी एस. अय्यर यांची ओळख करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे. डॉ. शुभलक्ष्मी यांनी आयुर्वेदिक मेडिसिनमध्ये बॅचलर्स पदवी मिळविली आहे. हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये डिप्लोमा केला आहे आणि हयुमन रिसोर्स मॅनेजमेंटची पदवी मिळविली आहे.

वस्तीपातळीवरील आरोग्य सोयी सुविधांबाबत, डॉ. शुभलक्ष्मी यांना १२ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी आपल्या करिअरची सुरुवात चिरनेर जनरल हॉस्पिटलमध्ये निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून केली. त्यानंतर त्यांनी एम. ए. पोद्दार हॉस्पिटल, सायन, पॉलिक्लिनिक अँड नर्सिंग होम आणि एन.एस.जैन चॅरिटेबल हॉस्पिटल येथेही काम केले. कॅन्सर पेशंटस् एड् सोसायटी, एन्.पी.एस्.पी.(नॅशनल पोलिओ सर्व्हेलन्स प्रोजेक्ट), आय.सी.एम.आर., इम्पॅक्ट इंडिया फाऊंडेशन आणि निरामय हेल्थ फाऊंडेशन अशा विविध संस्थांमध्ये त्यांनी सार्वजनिक आरोग्यातील वेगवेगळया प्रश्नांवर काम केले आणि वेगवेगळी पदे भूषविली. त्यांचे याआधीचे पद होते – निरामय हेल्थ फाऊंडेशन मधील प्रोग्रॅम डायरेक्टर.

भविष्य अलायन्समधील आम्हां इतर सर्वांना तुम्ही देत असलेले सहकार्य त्यांनाही तुम्ही द्यावे, ही विनंती. त्यांना shubalakshmi@bhavishyaalliance .org. in या इ-मेलवर तुम्ही संपर्क साधू शकता.

सदिच्छांसह
मूर्ती

-------------------------oooooooooooooo-------------------------

तुम्हाला जर कोणत्याही सूचना, प्रतिसाद किंवा सहभाग द्यायचा असेल तर संगीता दासमोहपात्र यांना लिहा:- sangeeta@bhavishyaalliance.org.in / sangeetadm@yahoo.com, भविष्य अलायन्स, प्लॉट नं.१३१, जे लेन, सागर विहार जवळ, वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३.फोन: ९१-२२-२७८२३२०२ / २७८२१६५७ फॅक्स : ९१-२२–२७८२४६२९